# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ७९७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/१२/२०१६

**१) डॉक्टरच्या हलगर्जीपनामुळे महीलेचा मृत्यु**

दिनांक १९/०२/२०१६ चे २०.४० वा. ते २३.०० वा. दर. यातील अर्जदार मनोज नामदेव मारबते वय २७ वर्ष रा. पांजरेपार त. भिवापुर जि. नागपुर यांची पत्नी सौ. मेघा मारबते वय २४ वर्ष ही दि. १९/०२/२०१६ ला रात्री २०.४० वा. दर. गरोदर असल्याने तिला डॉ. नाकाडे नर्सीग होम भंडारा येथे भरती केले असता तीला त्याच रात्री २३.०० वा. डॉ. आशीष कुकडे रहाटे हॉस्पीटल नागपुर याचे कडे रेफर केले असता, तेथील डॉ. यांनी तपासुन मृत घोशीत केले डॉ. प्रियंका नाकाडे यांनी ॲम्बुलन्स मध्ये ऑक्सीजन सिलेंडची व्यवस्था न करता डॉ. प्रियंका नाकाडे यांचे कडे प्रसुती करधचे प्रशिक्षण नसतांना सुध्दा प्रसुती करीता तिला भरती केले अशा प्रकारे डॉ. प्रियका नाकाडे यांनी हलगर्जीपणा केले असे अर्जदार यांचे बयाणावरून व मा. जे.एम.एफसी.कार्ट भंडारा यांचे आदेशान्वये पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०४ (अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) अंगणात दोराने बाधंलेली शेळी ची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०३/१२/२०१६ रोजी १६.वा. दर. यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत फिर्यादी सुधाकर रामचद्र ढेंगे वय ५८ वर्ष रा. पाऊलगाव यांचे घराच्या अंगणात दोराने बांधुन असलेली १ काळया रंगाची शेळी कि. ४,०००/–रू ची दोर सोडुन मोटार सायकल क्र. एमएच ३४ ७७५३ वर मांडुन चोरी करून पळुन ताज असतांना फिर्यादीने आरडावोरड केल्याने आरोपीतांनी मोटार सायकलला थांबवुन शेळी सोडुन दिली.असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९,५११,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा खंडाते पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद**

दिनांक ०३/१२/२०१६ चे १५.०० वा. दर. यातील फिर्यादीचे घरी आरोपी हा अनाधिकृतपणे प्रवेश करून फिर्यादीची अल्पवयीन मुलगीही घरी एकटीच हजर असतांनी तिच्यावर लैगिंक हल्ला करून विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(ड),४५१, भादंवि. सहकलम ८ बा.लै.सं.अधी. सन २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अवैध दारु /जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०३/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, तुमसर, साकोली व करडी पवनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू कि. २५००/–रू. व देशी दारू ०१ लिटर ८०० मिलीलीटर देशी दारू कि. ५००/–रू तसेच जुगारातुन कि. ४२०/–रू असा एकुण कि. ३,४२०/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९०४९००३३७२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.